
।।गणेशविद्या।।

ध्वन्यात्मक लेखनाची भारतीय परंपरा



लिपिकार

ल. श्री. वाकणकर

61/-

||गणेशविद्या||

ध्वन्यात्मक लेखनाची भारतीय परंपरा

भाग १

लेखक : लिपिकार ल. श्री. वाकणकर

मा न स न्मा न प्र का श न पु णे ४

वैष्णवी मूर्ति

मानसन्मान ०॥६४वा॥०

मूळ ग्रंथ — 'Ganesh-Vidya'
The traditinal Indian approach to Phonetic Writing
Script Study Group, Bombay 1968.

परिवर्धित — 'गणेशविद्या'
ध्वन्यात्मक लेखनाची भारतीय परंपरा
मराठी आवृत्ती इ. १९९८,

लेखक : लिपिकार ल. श्री. वाकणकर.

प्रकाशन तिथी : माघ व. ४ संकष्ट चतुर्थी, शके १९१९
१५ फेब्रुवारी १९९८.

मुद्रक-प्रकाशक : रवींद्र कुलकर्णी
मानसन्मान प्रकाशन
४/४० चंद्रप्रकाश, कर्वे पथ, पुणे ४११००४.

मुद्रणस्थळ : पुणे मुद्रण विद्यालय,
२०९, ब/४ नवी पेठ, शरद पंडित पथ, पुणे ४११०३०.

अक्षरजुळणी : सौ. प्रज्ञा संजय देशपांडे/सौ. विनया महाबळेश्वरकर.


मुद्रित शोधन : य. ए. धायगुडे/सुवर्णा वसंत भट.

कलात्मक मांडणी : मुकुंद वासुदेव गोखले.


मूल्य : रुपये १५०/-

ISBN-81-86167-13-26

अ, आ- कंठ्य स्वर-चित्रे (A, Ā - Guttural Vowel Symbol)



अ कार ध्यान



आ कार ध्यान

अ - हे भारतीय वर्ण-स्वर-मालेचे पहिले पुष्प, एकमात्रिक. याचे उच्चाराचे वेळी जीभ मध्यभागी स्थिर असते. दोन्ही ओष्ठ किंचित विलग, स्पंदन कंठस्थानी होते (बोट लावून पाहा).

सिद्ध शावर तंत्र श्री तत्त्व निधि - अथ अ-कार ध्यानम्। अजामुखी, रक्तवर्णा, हंसगा धवलांशुका, शरासनं वरं दक्षे धत्ते वामे शराभयौ॥

पंचरात्रागमे शेषसंहितायां 'अकारस्य विष्णुर्देवता, पद्मकिंजल्कवर्णः पीताम्बरः सर्वाभरणभूषितः गदा-पंकज-शंख-अरिधरः॥१॥

कामधेनुतंत्र - अः शिखायां सिद्धमंत्रे प्रगाहे केरसावणि चक्रे कुकुटमूर्धेन्दुबिम्बे ब्रह्मा-ईश-विष्णुषु॥

एकाक्षर-अर्थ - अग्नि, वर्षा, सूर्य, रथाश्व, चक्र, कोंबड्याचा तुरा, चंद्र, ब्रह्म, शिव, विष्णु (नानार्थ मंजरी)

आकार वर्णन - पद्मपुराण - रेखैकातु भवेदेवम् अ-कारस्तस्य पार्श्वतः। शिरोभागमुपक्रम्य, सकोणाधः प्रलम्बिनी ॥१००.४६॥

आ हे वर्णमालेचे दुसरे स्वर-पुष्प उच्चारताना 'अ' पेक्षा तोंड अधिक विस्तारलेले, त्यामुळे दीर्घ उच्चार द्विमात्रिक कालमानाचा. स्वरचित्रात पद्मपुराणानुसार 'आ' कारः स हि विज्ञेयः पट्टिकादक्षरेखया ॥४७ पूर्वार्ध॥

सिद्धशाबर - आकाराख्याथर्वणी तु श्यामा शुक्लाम्बराशुगा। धत्ते खट्वांच खेटंच क्रमेणैव वराभयौ ॥१॥ श्यामवर्णः ॥१॥

पाद्मसंहिता - अरुणपंकजवर्णः पीताम्बरः चक्रशंखाब्जगदाधरः सर्वाभरणभूषितः स्थिरः॥

कामधेनुतंत्रः आ-कारं परमाश्चर्यं शंख्यज्योतिर्मयं प्रिये। ब्रह्माविष्णुमयं वर्णं तथा रुद्रमयं प्रिये॥ पंचप्राणमयं वर्णं स्वयं परमकुंडली॥



इ कार ध्यान



ई कार ध्यान

एकाक्षर शब्दार्थ - ब्रह्मा, विष्णु, शिव, कर्ण कुंडली.

इ, ई - तालव्य स्वर चित्रे I, Ī (Palatal Vowel-Symbols)

इ - वर्णमालेचे तिसरे स्वर-पुष्प उच्चारताना जीभ कठीणतालूजवळ. तंत्रानुसार हा ध्वनि शक्तीचे रूप, परमानंददायक, पुष्पगंधी, गुणत्रयसमन्वित, सूक्ष्म (ह्रस्व), शाल्मली.

कामधेनु तंत्र - इ-कारं परमेशानि स्वयं कुंडलि मूर्तिमान्। ब्रह्माविष्णुमयं वर्ण तथा रुद्रमयं सदा॥

सिद्धशाबर - इ-काराख्या त्विलादेवी श्वेता मत्तेभगा शुभा। चंद्रहासवरौ दक्षे वामे धत्ते गदाभयौ॥ श्वेतवर्णः॥१॥

पांचरात्रागम - इ-कारस्य त्रिविक्रमो देवता (पाद्मसंहितायां) कालानल वर्णः पीतवासाः पद्मदंडारिशंखधरः सर्वाभरणयुक्तः स्थितः॥१॥

तमिळ लिपीतील रूप -

तिचे रूप स्त्रीलिंग असून ती महामाया, लोकाक्षी, शिवा, बिंदुमालिनी, कामकला, मातृकास्थान डावा डोळा, पद्मपुराण - वामे षड् वक्र, बिंदु द्वौ, 'इ'कार इति-कीर्तितः.


ई वर्णमालेचे हे चौथे स्वर-चित्र, द्विमासिक, परमशांति, कामधेनु तंत्रानुसार रूप कर्णकुंडली प्रमाणे, 'ई-कारः परमेशानि स्वयं परमकुंडली। ब्रह्माविष्णुमयं वर्ण तथा रुद्रमयं सदा॥

पद्मपुराण - 'इ'वर 'तस्य वामे शिरोरेखा लंबिन्या 'ई' उदाहृता॥१००-४८॥


सिद्धशाबर - ईश्वरी स्वर्णवर्णाभा वृषारूढा सितांशुका। शारिकां च वरं दक्षे वामे धत्तेंकुशाभयो॥ स्वर्ण वर्णः

पाद्मसंहिता - ई-कारस्य वामनो देवता बालार्कवर्णः पीतवस्त्रः शंखचक्रगदापद्मधरः आभरणभूषितः स्थितः।

उ ऊ, ओष्ठ्य चित्रे U Ū(Labial Vowel-Symbols)



उ कार ध्यान



ऊ कार ध्यान

उ- वर्णमालेचे हे पाचवे पुष्प उच्चारताना ओठ गोलाकार, जीभ अकारस्थानी.

पद्मपुराण– तस्यां तु लम्बरेखा स्यात्। तदंते च लवित्रवत्। 'उ'कारः स हि विख्यातः॥४९॥

वर्णाभिधान तंत्र– शंकरा, वर्तुलाक्षी भूता. न्यासात स्थान उजव्या डोळ्याजवळ.

कामधेनु तंत्र– 'उ'कारं परमेशानि अधः कुंडलिनी स्वयम्॥ पीतचंपकसंकाशं पंचदेवमयं सदा॥ पंचप्राणमयं देवी चर्तुवर्गप्रदायकम्॥
सिद्धशाबर– उग्रादेवी ह्युकाराख्या षड्भुजा सिंहगासिता। दक्षे शूलांकुशवरान्वामे पाशगदाभयान्। शुभ्र वर्णः॥

श्रीतत्त्व– उकारस्य श्रीधरोदेवता, पीतवर्णः पीतवस्त्रः पद्मचक्रगदाशंखधरः भूषायुक्तः स्थितः॥१॥


ऊ हे वर्णमालेचे सहावे स्वरपुष्प. 'उ' चे दीर्घ रूप. मातृकास्थान डाव्या डोळ्यावर.

पद्मपुराण– लवित्रद्वयतः तद् 'ऊ' ॥१००-४९॥
याप्रमाणे 'भारती' लिपीत लिहिलेले पुराण प्रशस्त असते ॥१००-५०॥

कामधेनु तंत्र–शंखकुंदसमाकारं ऊकारं परमकुंडली। पंचप्राणमयं वर्णं पंचदेवमयं सदा॥

श्री तत्त्वनिधी– ऊकारोर्जस्वला देवी शार्दूलवरवाहना। रक्ता चतुर्भुजा धत्ते खड्गखेटवराभयान्॥ रक्तवर्णः॥१॥

श्री तत्त्वनिधी – ऊ कारस्य हृषीकेशो देवता हरिद्वर्णः पीतवस्त्रः गदारिपद्म-शंखधरः भूषायुक्तः स्थितः॥



ऋ कार ध्यान

ऋ ॠ मूर्धन्य स्वर चित्रे Ṛ, Ṝ (Lingual Vowel-Symbols)


ऋ वर्णमालेचे सातवे पुष्प. याच्या उच्चारासाठी जीभ, कठोर तालु स्थानापेक्षा थोडी मागे ओढून वर मृदु 'टाळू' जवळ नेली जाते.

उथळ लिपिसुधारक (की कु-सुधारक?) मराठीच्या खोट्या अभिमानापायी म्हणतात की, आम्ही 'रु रू' म्हणतो, ही 'ऋ ॠ' रूपे काढून टाका. आई-बाप म्हातारे व निरुपयोगी झाल्यावर तुम्ही त्यांना ठार मारून टाकाल काय? यावर आणखी एक चिंतनीय प्रश्न आहे. जसे 'अ+अ' चे 'आ' होते, 'इ+अ' चे 'य', 'उ+अ' चे 'व' होते तसे 'ऋ+अ' चे 'र' आणि 'ऌ+अ' चे 'ल' होते. जर 'य, र, ल, व' ठेवायचे तसे त्यांचे मूळ ध्वनी 'ऋ' आणि 'ऌ' हे, व्युत्पत्तिसाधनेसाठी वर्ण-मालेंत राहायलाच हवे!

स्वतःला विद्वान समजणारे उठवळ लिपिसुधारणेचे कैवारी कधी कधी म्हणतात 'यांचा उपयोग भाषेत फारच कमी होतो, तेव्हा ही अडगळ काढून टाकावी! यावर प्रतिप्रश्नाचे उत्तर काय? अल्पमतवाल्यांचे तुष्टीकरण तुम्ही निवडणुकीत करता, तेव्हा तुमच्या बापाची तरी हिम्मत आहे काय, की अल्पसंख्य व त्यांतील कांही गद्दार आढळतात, त्यांना बहिष्कृत करण्यांची तुमची छाती आहे काय? एखादी गोष्ट काढून टाकणें सोपे आहे, परंतु जेव्हा शास्त्रीय विषयांत तिची गरज लागेल तेव्हा ती तुम्हाला पुन्हा प्रस्थापित करता येईल काय? I. P. A. (International Phonetic Alphabet) चा आग्रह धरणारे तर मग तुम्हाला महामूर्ख ठरवावे लागतील. तेव्हां यातील तात्पर्य असे की सर्व बाजूंचा विचार केल्याशिवाय वायफळ बोलू नये. अस्तु.

'ऋ' या एकाक्षरी शब्दाचा अर्थ असतो - स्वर्ग, दहा लाखांची संख्या, अदिति, केतु. न्यासात 'ऋ' चे स्थान उजव्या नाकपुडीवर असते.

कामधेनु तंत्र - 'ऋ'कारं परमेशानि कुण्डली मूर्तिमान् स्वयम्। अत्रं ब्रह्मा च विष्णुश्च सदाशिववराननेे। सदाशिवयुतं वर्ण सदा ईश्वरसंयुतम्। मंत्रवर्णमयं वर्ण चतुर्ज्ञान- मयं तथा। रक्त विद्युल्लताकारं ऋ-कारं प्रणमाम्यहम्॥



ऋ कार ध्यान



ऌ कार ध्यान



ॡ कार ध्यान

सिद्धशाबर - 'ऋ'तुधामा 'ऋ'काराख्या रक्तवर्णा वृषस्थिता। दक्षेपाशवरौ धत्ते तथा वामेंकुशाभयौ। रक्तवर्णः॥१॥ ऋ-कारस्य पद्मनाभो देवता नीलोत्पलः भूषायुक्तः पीतवस्त्रः शंखचक्रपद्मगदाधरः भूषायुक्तः स्थितः॥१॥

ॠ - हे वर्णमालेचे आठवे स्वर-पुष्प 'ऋ'ची मात्रा डावीकडून खालपर्यंत

सिद्धशाबर - ॠ-काराख्या रेणुकेयं षडास्या षड्भुजा सिता। शूले पाशं वरं दक्षे, वामे खड्गगदाभयान्॥ दधाना रक्तसिंहस्था क्रूरा लोकभयंकरी॥ रक्तवर्णः॥१॥

श्रीतत्त्व - ॠ-कारस्य दामोदरो देवता जपापुष्पवर्णः पद्मशंखगदाचक्रधरः पीतवस्त्राभरणादियुक्तः स्थितः॥१॥

ऌ-ॡ-दन्त्य स्वर चित्रे Ḷ (Dental Vo-syms)

ऌ वर्णमालेचे नववे स्वर-पुष्प. याचा मराठी पारंपरिक 'ऌू' सदृश उच्चार चुकीचा असून सततोच्चारी 'ऋ' प्रमाणे 'ऌ' केला पाहिजे. तो उच्चार अ-कार मिळवला की त्यांतून 'ऌ' हा अर्धस्वर उत्पन्न होतो. या स्वराचा उपयोग फक्त 'क्लृप्ती' या एकाच शब्दात होतो.

शाबर तंत्र – 'ऌ'तंभरा 'ऌ'काराख्या श्यामा व्याघ्रवरं स्थिता। चतुर्मुखाष्टहस्तेयं धत्तेऽस्त्राणि करैः परैः॥१॥

त्रिशूलपाशडमरुवरान् वामकरैस्तथा। खड्गं कपालमुसलाभयान्पीतांबरा शुभा॥ श्यामवर्णः॥१॥

श्रीतत्त्व - ऌकारस्य शंभुर्देवता त्रिनेत्रः अरुणवर्णः। जटामुकुटधारी अभयपरशुमृग- वरहस्तः व्याघ्रचर्मधारी॥१॥

ॡ- वर्णमालेचे दहावे स्वर-पुष्प. याचा शब्दात उपयोग होत नाही.

सिद्धशाबर- ॡकारा ॡंजिकाख्यैषा पुष्पदंतगजस्थिता। रक्ता दशभुजार्धेन दक्षादि क्रमशः करैः॥१॥ त्रिशूलपाशमुसलचंद्रहासवराञ्छुभान्। वामैः करैः खड्गखेटगदा-शक्त्यभयांस्तथा॥२॥ रक्तवर्णः॥१॥

श्रीशक्तिनिधी - ऌ-कारस्य नारायणो देवता असितद्युतिः शंखपद्मगदाचक्रधरः वनमालाभरणादिभूषितः पीताम्बरः स्थितः॥१॥

ए ऐ संध्यक्षर स्वरचित्रे E, AI (Conjunct Vo-symbols - Dipthongs)




ए कार ध्यान

ए हे अकरावे स्वर-पुष्प. ते कंठ-तालव्य आहे. हा गट 'गुण' म्हणवला जातो. व्याकरणात न्यासातील स्थान ओठ.

कामधेनु तंत्र - एकारं परमं दिव्यं ब्रह्माविष्णुशिवात्मकम्। रंजिनी कुसुमप्रख्यं पंचदेवमयं सदा॥

सिद्धशाबर तंत्र - एकाराख्या रेवती स्याद्दशास्यारुण्डमालिनी। रक्ता विंशद्भुजा सिंहवाहना फाललोचना॥१॥ करैर्धत्ते चक्रशूलपाशखड्गकमण्डलून्। अक्षसूत्रं च चिन्मुद्रां भुशुंडीं मुद्गरं वरम्॥२॥ वामे धत्ते करैश्शंखं भिण्डींदुमृगखेटकान्। कपालं दहनं शोषं दंडं चैव गदाभयान्॥३॥रक्तवर्णः

श्रीतत्त्व - 'ए'-कारस्य माधवो देवता धवलवर्णः पीतवस्त्रः गदाचक्रशंखांबुजधरः भूषिताः स्थितः॥१॥



ऐ कार ध्यान

ऐ - हे बारावे स्वर-पुष्प. वरीलप्रमाणे

सिद्धशाबर - ऐ-काराख्या शुभ्रवर्णा रेवती त्रिशिरा हिता। मयूरगा षड्भुजेयं रक्त केशैश्च संवृता॥१॥ अर्द्धैधत्ते करैश्चक्रं त्रिशूलं च वरं तथा॥२॥ शुभ्रवर्णः॥

श्रीतत्त्व - ऐ-कारस्य गोविंदो देवता पाटलाभः पीतवासः पद्मचक्रशंखगदाधरः। भूषणभूषितः। स्थितः॥१॥



ओ कार ध्यान

ओ, औ संध्यक्षर स्वर चित्रे O, AU (Diphthongs, Conjunct Vo-Syms)

ओ - तेरावे स्वर-पुष्प. हे कंठौष्ठ आहे. हा गट व्याकरणात "वृद्धी" गटात बसतो, जसे नो+अति = नवति.



औ कार ध्यान



अं कार ध्यान

श्रीतत्त्व - ओ-कारात्वश्विनी देवी रक्तवर्णा षडानना। मयूरगार्कबाहुः स्याद्धते दक्षेंकुशं शरम्॥१॥ खड्गं पाशं च चिन्मुद्रां दरंचाके करेक्षणा। वामे शूलं कार्मुकं च खेटं मुसलमेव च ॥२॥ पुस्तकं चाभयं चैव सर्वशत्रुभयंकरी॥ रक्तवर्णः॥ ओकारस्य वासुदेवो देवता घनश्यामः पीतवस्त्रः पद्मचक्रशंखगदाधरः भूषणभूषितःस्थितः॥

हल्लीचे रूप हे खऱ्या जुन्या रूपाचे भ्रष्ट रूप मानले पाहिजे. वस्तुतः १५-१६ वे शतकापर्यंत शुद्ध स्वतंत्र रूप बंगाली व अन्य लिप्यांचे परंपरेप्रमाणे होते - उ. लिपिसुधारक मंडळींना पूर्वेतिहासाचा परिचय करून घेण्याची प्रवृत्ती कमीच. त्यांनी पूर्वरूप घेण्याचे सुचवायला हवे होते. ती खरी सुधारणा होऊ शकेल. येथे आणखी एका खऱ्या व ध्वन्यात्मक 'सुधारणे'कडे दुर्लक्ष झाले. सध्याचे 'रेफ'चे स्थान अशास्त्रीय आहे. डोक्यावर रेफ हे क्रमयुक्त आहे. पण रेफ नंतर काढण्यात येते हा दोष आहे। उदाहरणार्थ - धर्म कूर्म सर्व - हे असे लिहावयास हवे - धर्‍म, कूर्‍म, सर्‍व इत्यादी. असो.


औ - हे चौदावे स्वर-पुष्प. इतर विषय वरीलप्रमाणे. मातृकान्यासाचे स्थान दातांचे वर आहे.

कामधेनुतंत्र- रक्तं विद्युल्लताकारं औ-कारं कुण्डलीस्वयम्॥ अत्र ब्रह्मादयः सर्वे तिष्ठन्ति सततं प्रिये॥१॥


सिद्धशाबर - औकाराख्या ह्यघोरेयं कराली दीर्घजिह्विका। एकवक्त्रा वक्रनेत्रा भ्रुकुटी कुटिलेक्षणा॥१॥ नीलमेघनिभा रौद्री भेरुण्डवरवाहना। षड्भुजार्धकरैर्धत्ते शूलं खड्गं वरं तथा॥२॥ गदाखेटाभयान्वामे दधाना च महोदरी॥ श्यामवर्णः॥ औकारस्य संकर्षणोदेवता रक्तवर्णः पीतवस्त्रः गदाशंखाब्दचक्रधरः भूषणभूषितः स्थितः॥१॥

अं, अः अयोगवाह (म्हणजे अलिप्त) Am, Ah Non-Joining Signs. These signs are not attaching Matras. They are non Vargeeya signs.

अं - सिद्धशाबर - अंजनाभांजना देवी पंचास्या जटिला कृशा। महोदरी



अः कार ध्यान



क वर्ग ककार ध्यान

महाव्याघ्रवरवाहनमास्थिता॥१॥ चतुर्भुजा शूलपाशवराभयकरा मता॥ षड्भुजा शूलपट्टासिवरदानकरान्विता। वामेऽकुशमहाखेटाभयान्धत्ते करैः क्रमात्॥२॥ रक्तवर्णः॥

अं-कारस्य प्रद्युम्नो देवता कनकत्कनकवर्णः चक्रशंखगदापद्मधरः भूषितः स्थितः॥१॥

अः Non-joining like above, Non-Vargeeya sign.

अः सिद्धशाबर - अः इत्याख्या त्वजादेवी त्रिशिराश्च त्रिलोचना। रक्ता पीताम्बरा क्रूरतरक्षुवरवाहना॥१॥ षड्भुजा शूलपट्टासिवरदानकरांचिता। वामेऽकुशमहाखेटाभयान्धत्ते करैः क्रमात्॥रक्तवर्णः॥१॥

अःकारस्य अनिरूद्धो देवता दूर्वादलश्यामः चक्रगदाशंखपद्मधरः भूषणभूषितः स्थितः॥१॥

इति स्वर वर्गः।

व्यंजन वर्गः

क ख ग घ ङ, कण्ठ्यवर्गीय क-वर्ग

क - व्यंजनमालेतील प्रथम पुष्प

एकाक्षरी 'क' चे अर्थ - कश्यप, ब्रह्मदेव, दक्ष, वायू, सूर्य, यम, विष्णू, कामदेव, अग्नी, आत्मा, राजा, मयूरपक्षी, शरीर, लता, मेघ, शब्द, ध्वनी, प्रकाश, केश, धन, सर्व व्यंजनांची मूळ शक्ती.


कामधेनुतंत्र - क-प्रकृति सुंदरी, देवमाता, पंचदेवापैकी त्रिपुरासुंदरी - ऋग्वेदात प्रजापतिपुत्र हिरण्यगर्भाचे 'क'वर एक संपूर्ण सूक्तच आहे -"कस्मै देवाय हविषा विधेम" (ऋ. १२१, १-१०)

कामधेनुतंत्र - वामरेखा भवेद्ब्रह्मा विष्णुर्दक्षिणरेखिका। अधोरेखा भवेद्रुद्रो मात्रा साक्षात् सरस्वती॥१॥

श्रीतत्त्व - भूतविन्यासिनी शुभ्रा गजारूढा चतुर्भुजा। त्रिशूलं च वरं दक्षे वामेऽकुश-



ख कार ध्यान



ग कार ध्यान



घ कार ध्यान

मथाभयम्॥ श्वेतवर्णः॥१॥

शक्तिनिधि - क-कारस्य विधिर्देवता चतुर्मुखः हेमवर्णः वराभय कुंडिकाक्षसूत्रकरः मुख्यहस्तयोर्वराभयधरः अन्ययोः कुंडिकाक्षसूत्रधरः जटामंडलधरः सुखासीनः॥१॥

ख व्यंजनमालेतील दुसरे पुष्प. 'क' चे महाप्राण रूप. अर्थ - आकाश, अवयव, सुख, ब्रह्म, ज्ञान.

कामधेनुतंत्र - कुंदपुष्पाप्रमाणे पांढरा रंग, शंख वर्ण, त्रिगुण, पंचदेव, त्रिशक्ति, भव्य रूप, कामरूपी ऋद्धि वाहनी, सरस्वती इ.

श्रीतत्त्व - खंजरीटस्थिता पीता त्रिशिरांश्च त्रिशूलिनी।
खाख्या खद्योतिनी खड्गवरांभयकरा मता॥ पीतवर्णः॥१॥

शक्तिनिधिः - ख-कारस्य सुदर्शनो देवता अग्निज्वालावर्णः षट्कोणसंस्थाः शंखचक्रचापपरश्वसीषु शूलपाशांकुशाब्जवज्रखेटहलमुसलगदाकुतायुधधरः सर्वाभरणभूषितः ज्वालाकेशः स्थितः ॥१॥


ग - व्यंजनमालेतील तिसरे पुष्प. मृदु अल्पप्राण अर्थ - गौ, गौरी, गणेश, गोकुलेश्वर, गंधर्व, इ.

श्रीतत्त्व – गाख्या धूम्रा चतुर्वक्त्रा सिंहस्थाष्टभुजा शुभा। धूम्राभा दक्षिणे धत्ते शूलं चाक्षं स्रुवं धरम्॥१॥
वामे तु पुस्तकं कुण्डं कपालमभयं क्रमात् ॥ धूम्रवर्णः॥१॥


शक्तिनिधिः – गकारस्य वाणी देवता स्फटिकवर्णा। अक्षमालापद्मशुकपुस्तकधरा प्रादक्षिण्येन सर्वालंकारभूषिता॥१॥

घ - व्यंजनमालेतील चवथे पुष्प मृदु महाप्राण.

कामधेनुतंत्र – घकारं चपलापांगी चतुष्कोणात्मकं सदा । पंचप्राणमयं वर्णमरुणादित्यसंन्निभम्॥१॥



ङ कार ध्यान



च कार ध्यान

शब्दकल्पतरू – मालतीपुष्पवर्णाभां षड्भुजां रक्तलोचनां शुक्लांबरपरीधानां शुक्लमाल्यविभूषिताम् ॥ सदा स्मेरमुखीं रम्यां लोचनत्रयराजितां । एवं ध्यात्वा घकारं तु तन्मंत्रं दशधा जपेत्॥१॥

श्रीतत्त्व – कृष्णवर्णा घरूपा च सूकरास्या कृशोदरी। षड्भुजा शूलखट्वांगवरान् दक्षभुजैः क्रमात्॥१॥ वामे खड्गं तथा खेटमभयं शत्रुभंजनी ॥ कृष्णवर्णः॥१॥

शक्तिनिधिः – घ कारस्य शारङ्गधारी देवता हेमनिभः नराकृतिः दक्षिणहस्ते तर्जनीमुद्रान्वितः वामहस्ते कटिमवलंब्य स्थितः स्वचिह्नांकितमस्तकः स्थितः॥१॥

ङ - व्यंजन मालेतील पाचवे पुष्प नासिक्य वर्ग.

कामधेनु तंत्र – ङकारं परमेशानी स्वयं परमकुंडली सर्वदेवमयं वर्णं त्रिगुणं लोललोचनी। पंचप्राणमयं वर्णं ङकारं प्रणमाम्यहम् ॥१॥

श्रीतत्त्व – अनंतशक्तिर्देवेशी रक्ता बर्हिणवाहना। षडाननेशुचापासिखेट-दानाभयान्विता॥ रक्तवर्णः॥१॥

शक्तिनिधि – ङकारस्य नंदकोदेवता दूर्वादलश्यामः नराकृतिः दक्षिणहस्ते तर्जनीमुद्रान्वितः कटिविन्यस्तवामहस्तः । स्वचिह्नांकितमस्तकः॥१॥

च छ ज झ ञ, तालव्य, च वर्ग.

च - वर्णमालेतील सहावे व्यंजन पुष्प कठोर अल्पप्राण तालव्य.

वर्णोद्धार तंत्र – तुषारकुंदपुष्पाभ्यां नानालंकारभूषिताम्।
सदा षोडशवर्णीयां वराभयकरां पराम्॥
शुक्लवस्त्रावृत्तकटी शुक्लवस्त्रोत्तरीयिणीम्।
वरदां शोभनां रम्यां मध्यबाहुसमन्विताम्॥
एवं ध्यात्वा चकारं तु तन्मंत्रं दशधा जपेत्॥


श्रीतत्त्व – सुषमा चैकवक्त्रैषा हयारूढा चतुर्भुजा।



छ कार ध्यान



ज कार ध्यान



झ कार ध्यान

खड्गखेटधरा चाख्या वराभयकरा शुभा॥ स्वर्ण वर्णः॥

शक्तिनिधि – चकारस्य नंदको देवता, शेषं पूर्ववत्॥

छ - वर्णमालेतील सातवे व्यंजन पुष्प कठोर महाप्राण.

वर्णोद्धारं – ध्यानमस्याः प्रवक्ष्यामि द्विभुजां तु त्रिलोचना।
पीतांबरधरां नित्यां वरदां भक्तवत्सलाम्॥
एवं ध्यात्वा छ-कारं तु तन्मंत्रं दशधा जपेत्॥

श्रीतत्त्व – छो निर्झरारुंधतीयं पीता मर्कटवाहना।
त्रिशूलं क्षुरिकां पाशं खेटं च दधती शुभा॥ पीतवर्णः॥

शक्तिनिधि – छकारस्य यमोदेवता कालवर्णः अभयदंडपाशवरदहस्तः महिषारूढः करालवदनः॥

ज - वर्णमालेतील आठवे व्यंजन पुष्प. मृदु अल्पप्राण
शब्दकल्पद्रुम – ध्यानमस्याः प्रवक्षामि शृणुस्व कमलानने।
नानालंकारसंयुक्तं भुजैर्द्वादशभिर्युताम्॥
रक्तचंदनदिव्यांगीं विचित्रां स्वरधारिणीम्। त्रिलोचनां जगद्धात्रीं वरदां भक्तवत्सलाम्॥
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मंत्रं दशधा जपेत्॥

श्रीतत्त्व – जो भोगदाहिरक्ता स्यात्रिनेत्रा सिंहवाहना।
चतुर्भुजा खड्गखेटवराभयकरान्विता॥ रक्तवर्णः॥

शक्तिनिधि – जकारस्य मुसली देवता सस्यश्यामः नराकृतिः दक्षिणहस्ते तर्जनीमुद्रान्वितः कटिविन्यस्तवामहस्तः मस्तके स्वचिह्नांकितः सर्वाभरणभूषितः॥१॥

झ - हे नववे व्यंजन पुष्प. 'ज'चे महाप्राणरूप आहे. मृदु महाप्राण वर्ण.

वर्णोद्धार तंत्र – संतप्त हेमवर्णाभां रक्तांबरविभूषिताम्। रक्तचंदनलिप्तांगी रक्तमाल्यविभूषिताम्॥ चतुर्दशभुजां देवीं रत्नहारोज्ज्वलां पराम्। ध्यात्वा ब्रह्मस्वरूपां तां, तन्मंत्रं दशधा जपेत्॥



ञ कार ध्यान

श्रीतत्त्व – झो निर्झरनदी देवी शरन्मेघनिभांबुजाम् । पाशं वराभयौ धत्ते नक्रास्था शुभदा नृणाम्॥ शुभ्र वर्णः॥१॥

शक्तिनिधि – झकारस्य अंकुशधारी देवता हेमवर्णः नराकृतिः दक्षिणहस्ते तर्जनीमुद्रान्विताः कटिविन्यस्तवामहस्तः मस्तके स्वचिह्नांकितः सर्वाभरण-भूषितः॥१॥

ञ - हे दहावे व्यंजन पुष्प. नासिक्य वर्ग मृदु.

शब्दकल्पद्रुम – चतुर्भुजां धूम्रवर्णां कृष्णाम्बरविभूषिताम्। नानालंकारसंयुक्तां जटामुकुटराजिताम्॥ ईषद् हास्यमुखीं नित्याम् वरदां भक्तवत्सलां। एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मंत्रं दशधा जपेत्॥


श्रीतत्त्व – ञा ख्या प्रबोधिनी शुभ्रा सिंहस्था चित्स्वरूपिणी । त्रिशूलांबुजचिन्मुद्रा भयान्वितकराशुभा॥ शुभ्र वर्णः॥

शक्तिनिधि – ञकारस्य भृगुर्देवता दूर्वादलश्यामः दक्षिणहस्ते विज्ञानमुद्रां वामे पुस्तकं च दधानः उपवीतजरादिभिर्युक्तः ॥१॥

ज्ञ हे मूलाक्षर नसून तालव्य वर्गीय 'ज' आणि 'ञ' यांचे संयुक्त स्वनिम आहे. दाक्षिणात्य लिप्यांत याचे क्रमयुक्त चित्र स्पष्ट दाखवतात. याचे प्रांतोप्रांती उच्चारही वेगवेगळे करतात. दक्षिणेत संस्कृत प्रमाणे उच्चार 'ज्ञ' असा करतात, महाराष्ट्रात उगाचच त्याच्यात 'द' स्वनिम घुसडतात. हिंदी बंगालीत 'ग्यान' असा उच्चार करतात. उच्चार हे स्थानिक संस्कारामुळे होत असतात. माझाच उच्चार बरोबर, दुसऱ्याचा चूक, असे म्हणणे संकुचित दृष्टीचे लक्षण होय. लेखनात मात्र संदिग्धता नसते, पूर्वेकडील भारतात ओ-कारान्त उच्चार करावयाचे असतात. जसे – घडी (घोडी), रवींद्र (रोबीन्द्र), अरविंद (ओरोबिंदो), असे उच्चारतात. पंजाबकडील लोक विसर्गाच्या जागी ह असा उच्चार करतात. या स्वनिमाला तंत्रपरंपरेत स्वतंत्र देवता नसते. याकडे लक्ष असावे. ते जोडाक्षरच आहे, मुळाक्षर नव्हे.



ट कार ध्यान



ठ कार ध्यान

ट ठ ड ढ ण, मूर्धन्य 'ट' वर्ग

ट हे वर्णमालेतील अकरावे व्यंजनपुष्प. इतर अक्षरांच्या रूपात सातवे शतक म्हणजे श्रीहर्षाच्या कालानंतर, बरेच बदल होत आता तर त्याचे एकात्म सामान्य माणसाला कळतच नाही. पुराविद्येच्या विद्यार्थ्यांना मात्र या एकात्मतेचे भान असते. एक गंमत म्हणजे या गटातील गोल बुडांच्या रूपांत फार बदल झाले नाहीत. विशेषतः गाढवातील 'ढ' हा आदिकालापासून आजपर्यंत तसाच 'ढ' राहिला आहे!

या गटातील 'छ, ट, ठ, ड, ढ, द, ह, ळ' यांतील शीर्षदण्ड इतका आत घुसला आहे की इतर मध्यदंडित (क, फ) यांचा शेवटचा अवयव कापतात (क्‍ फ्‍), तसेच अंत्यदंडित अक्षरांचा दंड काना कापून अर्धाक्षरे बनवता येतात, परंतु या गटाचे तसे होत नाही. त्यासाठी 'हल्' (्) चिन्ह खाली 'स्वरविनाशक चिन्ह' म्हणून वापरतात; 'हल्' चिन्ह जेव्हा शब्दाच्या अंती येते तेव्हाच त्याला 'हलन्त' चिन्ह म्हणतात.


ट - कठोर अल्पप्राण मूर्धन्य गटाचे अक्षर आहे.

वर्णोद्धार तंत्र – मालतीपुष्पवर्णाभां पूर्णचंद्रनिभेक्षणाम्। दशबाहुसमायुक्तां सर्वालंकारसंयुताम्॥१॥ परममोक्षपदां नित्यां सदा स्मेरमुखीं पराम्।। एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मंत्रं दशधा जपेत्॥

श्रीतत्त्व – टाख्या च धारिणी देवी शूलटङ्कवराभयान्। धत्ते मत्तमतङ्गस्था पाटलाभा सितांशुका॥

शक्तिनिधि – ट-कारस्य कूर्मोदेवता कांचनसन्निभः। अभयचक्रशंखवरहस्तः पीतांबरधरः सर्वालंकारभूषितः॥

ठ - हे बारावे व्यंजन पुष्प. 'ट' चे महाप्राण. मूर्धन्य रूप आहे. या एकाक्षरा शब्दाचे नाना अर्थ – शिव, मोठा ध्वनी, वर्तुळ, चंद्र, इ.



ड कार ध्यान



ढ कार ध्यान

वर्णोद्धार तंत्र – पूर्णचंद्रप्रभादेवीं नित्यसत्पंकजेक्षणाम्। सुंदरीं षोडशभुजां धर्मकामार्थमोक्षदा ॥

श्रीतत्त्व – क्रिया सरस्वती 'ठा'ख्या टंकांकुशवराभयान्। धत्ते सिंहावरारूढा चैकवक्त्रारुणा मता॥ अरुण वर्णः॥१॥

शक्तिनिधि – ठ कारस्य पट्टाभिरामोदेवता श्यामवर्णः पीठे मध्ये सुखासीनः तद्वामे हेमवर्णसीता, पुरतः कनकवर्णो हनुमान्, पश्चिमे हेमवर्णो लक्ष्मणः, पार्श्वयो श्यामवर्णो भरतः। रक्तवर्णः शत्रुघ्नश्च वायव्ये हेमपिंगलः सुग्रीवः, कालवर्णो बिभीषणः रक्तवर्णोंगद कनकवर्णो जांबवान्, एतैः परिवृतः सर्वालंकारभूषितः॥१॥

ड - हे तेरावे व्यंजन पुष्प, मृदु अल्पप्राण, मूर्धन्य.

श्रीतत्त्व – 'ड' कारिणी पंचवक्त्रा सिता टंकगदाधरा। चतुर्बाहुः कुक्कुटस्था वराभयकरा च सा ॥ शुभ्र वर्णः॥१॥

शक्तिनिधि – 'ड'कारस्य गरुडो देवता कांचनप्रभः कुंचित दक्षिणपादः पृष्ठे निक्षिप्तवामपादः प्रसारितोभयपक्षः हृदिबद्धांजलिपुटः नानाभरणभूषितः॥१॥


ढ - हे चौदावे व्यंजन पुष्प, मृदु महाप्राण मूर्धन्य.

कामधेनु तंत्र व शब्दकल्पद्रुम – 'ढ'कारं परमाराध्यं या स्वयं कुंडली परा। पंचदेवात्मकं वर्ण पंचप्राणमयं सदा॥१॥ सदा त्रिगुणसंयुक्तं आत्मादितत्त्वसंयुतम्। रक्तविद्युल्लताकारं 'ढ'कारं प्रणमाम्यहम्॥२॥

श्रीतत्त्व – 'ढ'कारस्य सप्तमातृकादेवताः तत्र ब्राह्मी हेमवर्णा अभयशूलाक्षमालावर-हस्ता जटामुकुटधारिणी हंसध्वजवाहना सर्वालंकारभूषिता॥१॥ माहेश्वरी रक्ताभ्या अभयशूलाक्षमालावरहस्ता जटामुकुटधारिणी वृषभध्वजवाहना॥२॥ कौमारी अरुणप्रभा अभयशक्तिकुक्कुटवरहस्ता मयूरध्वजवाहना सर्वालंकारभूषिता॥३॥ वैष्णवी श्यामा अभयवरहस्ता जटामुकुटधारिणी गरुडध्वजवाहना सर्वालंकार-भूषिता॥४॥ वाराही श्यामवर्णा वराहमुखी अष्टभुजा दक्षिणगदिता अभयमुसलखड्गचक्राशंकुखेटकहलवरधरा सिंहारूढा सर्वालंकारभूषिता॥५॥ माहेन्द्री

रक्तवर्णा चतुर्भुजा अभयशक्तिवज्रवरहस्ता गजध्वजवाहना सर्वालंकारभूषिता॥६॥ चामुंडा रक्तवर्णा चतुर्भुजा अभयकपालशूलवरहस्ता व्याघ्रचर्मांबरधरा सर्वालंकार-भूषिता॥७॥

शक्तिनिधि – 'ढ'रूपिणी श्रीघनाख्या पंचवक्त्रा मयूरगा। तटिद्‌गौरी करैर्धत्ते शूलटंकवराभयान्॥ हेम वर्णः॥१॥



ण कार ध्यान

ण - हे पंधरावे व्यंजन पुष्प. मूर्धन्य नासिक्य.

शब्दकल्पद्रुम – ध्यानमस्य 'ण'कारस्य प्रवक्षामिव तच्छृणु। द्विभुजां वरदां रम्यां भक्ताभीष्टप्रदायिनीम्॥ राजीवलोचनां नित्यां धर्मार्थकाममोक्षदाम्॥ एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मंत्रं दशधा जपेत्॥

श्रीतत्त्व – 'णो' नंतशक्तिर्देवेशी रक्ता बर्हिणवाहना । एकवक्त्रा शूलशक्तिः वराभयकराशुभा॥ रक्तवर्णः॥१॥

शक्तिनिधि – 'ण' कारस्य विष्णुर्देवता पद्मकिंजल्कनिभः चतुर्भुजः पद्मगदाचक्रशंखधरः पीताम्बरः सर्वालंकारभूषितः स्थितः॥१॥



त कार ध्यान



थ कार ध्यान

त, थ, द, ध, न, दन्त्य, त-वर्ग

त हे सोळावे व्यंजन पुष्प, कठोर अल्पप्राण.

वर्णोद्धार तंत्र – चतुर्भुजा, शांता, षोडशवर्षीया, भाव रक्तवस्त्रा.


श्रीतत्त्व – ताख्या सरस्वती शुभ्रा सितपद्मासनांशुका॥ एकवक्त्रा करैर्धत्ते वीणातंत्री वराभयान्॥ शुभ्र वर्णः॥१॥

शक्तिनिधि –'त'कारस्य अच्युतो देवता पीतवर्णः चतुर्भुजः शंखपद्मचक्रगदाधरः। श्रीभूसहितः सर्वालंकारभूषितः॥१॥

थ - हे सतरावे व्यंजन पुष्प, कठोर महाप्राण.



द कार ध्यान



ध कार ध्यान

वर्णोद्धार तंत्र – नीलवर्णां त्रिनयनां षड्भुजां वरदां पराम्। पीतवस्त्रपरीधानां सदा सिद्धिप्रदायिनीम्। एवं ध्यात्वा थकारस्तु तन्मन्त्रं दशधा जपेत्॥

श्रीतत्त्व – पंचवक्त्रासिता 'था' ख्या नीलकंठा सरस्वती। शारिकां डमरूं धत्ते वृषारूढा वराभयौ॥ श्वेत वर्णः॥

शक्तिनिधि – अथ थकारस्य पुरुषोत्तमो देवता चक्रपद्मशंखगदाधरः चतुर्भुजः स्फटिक वर्णः सर्वालंकारभूषितः॥१॥

द - हे अठरावे व्यंजन पुष्प, मृदु अल्पप्राण.

वर्णोद्धार तंत्र – ध्यानमस्य 'ध'कारस्य वक्ष्यते शृणु पार्वती। चतुर्भुजां पीतवस्त्रां नवयौवनसंस्थिताम्। एवं ध्यात्वा द-कारं तु तन्मन्त्रं दशधा जपेत्॥

शक्तिनिधि – द-कारस्य अत्रिर्देवता अरुणप्रभः जटावान् आसीनः दक्षिणे ज्ञानमुद्रां वामे पुस्तकं च दधानः सर्वालंकारभूषितः.॥१॥


श्रीतत्त्व– एकवक्त्रारुणादाख्याऽष्टभुजा भोगदायिनी। धत्तेऽब्जे शारिकां वीणां डमर्वेणवराभयान्॥१॥ अरुण वर्णः॥

ध - हे एकोणिसावे व्यंजन पुष्प मृदु 'द'चे महाप्राण रूप


कामधेनु तंत्र – ध-कारः परमेशानी कुंडली मोक्षरूपिणी। आत्मादितत्त्वसंयुक्त पंचदेवमयं सदा॥ पीतविद्युल्लताकारं चतुर्वर्णप्रदायकम्। एवं ध्यात्वा ध-कारन्तु तन्मत्रं दशधा जपेत्॥१॥

श्रीतत्त्व – अथ ध-कारस्य कुबेरो देवता सितप्रभः द्विभुजः पद्मखलीनहस्तः तुरंगारूढः सर्वाभरणभूषितः॥१॥


शक्तिनिधि – श्यामला चामलाधाख्या ह्येकवक्त्रा चतुर्भुजा। वृषस्था शारिकामब्जं करैर्धत्ते वराभयौ॥ श्यामवर्णः॥१॥



न कार ध्यान



प कार ध्यान



फ कार ध्यान

न - विसावे व्यंजन पुष्प. दंत्य वर्गाचे नासिक्य व्यंजन.

वर्णोद्धार तंत्र – ध्यानमस्य 'न' कारस्य वक्ष्यते शृणु भाविनी। दलितांजन वर्णाभां ललज्जिह्वां सुलोचनाम्॥

चतुर्भुजां कोटराक्षीं चारुचंदनचर्चिताम्। कृष्णाम्बरपरीधानामीषद् हास्यमुखीं सदा॥

श्रीतत्त्व – न-कारस्य लंबोदरो देवता अरुणप्रभः चतुर्भुजः भग्नदंतः पाशांकुशमहाफलहस्तः गजवक्त्रः सर्वाभरणभूषितः॥

शक्तिनिधि – नोनंतशक्तिर्देवेशी मत्तमातंगसंस्थिता। एकवक्त्रा तडिद्गौरी धत्ते पद्मवराभयान्॥ हेमवर्णः॥

प - एकविसावे व्यंजन पुष्प. कठोर अल्पप्राण.

कामधेनु तंत्र – चतुर्वर्गप्रदं वर्णं शरच्चंद्रसमप्रभम्।
पंचदेवमयं वर्णं स्वयम् परमकुंडली। पंचप्राणमयं वर्णं त्रिशक्तिसहितं सदा त्रिगुणावहितं वर्णं आत्मादितत्त्वसंयुतम्॥

श्रीतत्त्व – 'पा'ख्येच्छा शक्तिरूपेयं शूलशक्तिवराभयान्।
धत्ते करैः पंचवक्त्रा फुल्लपद्मासनारुणा। रक्तवर्णः॥१॥

शक्तिनिधि – प-कारस्य योगनृसिंहो देवता हेमनिभः जानूपरिप्रसारितमुख्यबाहुद्वयः इतरास्यां चक्रशंखधरः सर्वालंकारभूषितः॥१॥


फ बाविसावे व्यंजन पुष्प 'प'चे कठोर महाप्राणरूप

कामधेनु तंत्र – फ-कारं शृणु चार्वांगी रक्तविद्युल्लतोपमम् । चतुर्वर्गप्रदं वर्णं पंचदेवमयं सदा॥ पंचप्राणमयं वर्णं सदात्रिगुणसंयुतम्। आत्मादितत्त्वसंयुक्तं त्रिबिंदुसहितं सदा॥१॥

श्रीतत्त्व – फ-कार, पंचवक्त्रोग्रसिंहस्था पाटला तपकोमला। फा-ख्यां शुकैणासिखेट- वराभयधराशरान्॥१॥ पाशं च डमरुं शूलं क्रमेण दशभिः करैः॥ पाटल वर्णः॥२॥



ब कार ध्यान



भ कार ध्यान



म कार ध्यान

शक्तिनिधि – फ-कारस्य भीमनृहरिर्देवता तप्तकांचनसंन्निभः चतुर्बाहुभिश्चतुश्चक्राणि दधानः। ज्वालाकेशधरः दंष्ट्रा करालवदनः सर्वालंकारभूषितः॥१॥

ब - तेविसावे व्यंजन पुष्प. मृदु अल्पप्राण.

कामधेनु तंत्र - ब-कारं शृणु चार्वांशी चतुर्वर्णप्रदायकं शरच्चंद्रप्रतीकाशं पंचदेवमयं सदा। पंचप्राणात्मकं देवी त्रिबिंदुसहितं सदा॥१॥

श्रीतत्त्व - चिच्छ्यामला बभ्रुवर्णा सिंहारूढा बरूपिणी॥ धत्ते क्रमेण दशभिः करैः पूर्ववदायुधान्॥ बभ्रुवर्णः॥

शक्तिनिधि - ब-कारस्य बलरामो देवता सितप्रभः द्विभुजः दक्षिणे हलधरः प्रलंब-वामहस्तः नीलांबरधरः सर्वालंकारभूषितः॥१॥

भ - चोविसावे व्यंजन पुष्प, मृदुमहाप्राण.

कामधेनु तंत्र - त्रिशक्तिसहितं वर्णं त्रिबिंदुसहितं प्रिये। आत्मादितत्त्वसंयुक्तं भ-कारं प्रणमाम्यहम्॥१॥

श्रीतत्त्व - भा-ख्या तु श्यामला उद्यद्रविनिभा धत्ते शरचापवराभयान् चैकवक्त्रा भद्रासने स्थिता।


शक्तिनिधि - भ-कारस्य पूर्वोक्त योगनृसिंहो देवताः अन्यत् सर्वं प-कारवत्॥१॥

म - पंचविसावे. नासिक्य.


वर्णोद्धार तंत्र - म-कारं शृणु सर्वांगी स्वयं परमकुंडली। तरुणादित्यसंकाशं चतुर्वर्ण-प्रदायकः। पंचदेवमयं वर्ण पंचप्राणमयं सदा॥१॥

श्रीतत्त्व - मो विद्या श्यामला देवी हयास्या स्फटिकप्रभा। वीणावादनतत्त्वज्ञा वराभयकरा शुभा॥

शक्तिनिधि - म-कारस्य नारायणो देवता श्यामवर्णः पद्मासनस्थः चतुर्भुजः शंखचक्र गदापद्मधरः श्रीभूम्यां सहितः सर्वाभरणभूषितः॥१॥



य कार ध्यान



र कार ध्यान

य र ल व अर्धस्वरः किंवा "अंतस्थ" वर्ण


व्यवहारात सर्व स्वरांची वारंवारता (frequency of use) ही सर्वांत जास्त असते म्हणजे ३४.६५% असते. भारतीय लिप्यांत स्वरप्रधानता आहे (त्याच्याशी तुलना करता पाश्चात्त्य लिप्यांत स्वर-चित्रे फारच थोडी आहेत.). स्वरानंतर 'अर्धस्वरां'ची वारंवारता येते, ती या क्रमाने - य - २.४०%, र - ५.५५%, ल - ३.३३%, व - १.३७ % यांना 'अर्धस्वर' म्हणण्याचे कारण म्हणजे त्यांची उत्पत्ती अशी होते इ + अ = य, ऋ + अ = र, ऌ + अ = ल, उ + अ = व.

वर्ण-दरिद्री रोमन अक्षरे ध्वनिलेखनासाठी कमी पडतात म्हणून पाश्चात्त्य भाषा शास्त्रज्ञांनी त्यांच्या A E I O U यांचे परिवर्धनासाठी, तसेच व्यंजनांच्या परिवर्धनासाठी 'आंतरराष्ट्रीय ध्वनिवर्ण माला' (International Phonetic alphabetic) मानक केली आहे. परंतु तिचा उपयोग फक्त विशेष प्रसंगीच होतो. रोजच्या व्यवहारात होत नसतो. आता मुख्य विषयाकडे वळू या.

य - य हे सव्विसावे व्यंजन कंठ-तालव्य म्हणून तालव्य गटांत बसते.
कामधेनु तंत्र - य-कारं शृणु चार्वांगी चतुष्कोणमयं सदा। पलाशपुष्पसंकाशं स्वयं परमकुंडली। पंचप्राणमयं वर्णं पंचदेवमयं सदा। त्रिशक्तिसहितं वर्णं त्रिबिंदुसहितं सदा। प्रणमामि सदा वर्णं भूतिं मोक्षमव्ययम्।
श्रीतत्त्व - या-ख्येयं दीपिनी देवी सिंहस्थाऽष्टभुजा सिता। शूलचापेशुपाशासि खेटदानाभयान्विता॥ शुभ्र वर्णः॥१॥

शक्तिनिधि - य-कारस्य वायुर्देवता धूम्रवर्णः द्विभुजः अंकुशध्वजहस्तः हरिणारूढः सर्वाभरणभूषितः॥१॥

र - हे सत्ताविसावे व्यंजन पुष्प, मूर्धन्य गटातले. नागरी लिपीत मूलाक्षरांच्या आकृतिपरत्वे याची पाच रूपे उपयोगांत येतात :-
पूर्व रूपे– - = , रेफ (^), सामान्यरूप 'र', अंत्यरूपे – ˏ, ˆ



ल कार ध्यान



व कार ध्यान

वर्णोद्धार तंत्र - ललज्जिह्वं महारौद्रीं रक्तास्यां रक्तलोचनाम्। रक्तवर्णाष्टभुजां रक्तपुष्पोपशोभिताम्॥ रक्तमाल्यांबरधरां रक्तालंकारभूषिताम्। महामोक्षप्रदां नित्यामष्टसिद्धिप्रदायकाम्॥ एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मंत्रं दशधा जपेत्॥

श्रीतत्त्व - 'रेफा' ख्या रेचिका श्यामा सिंहस्था लोहितांशुका। पंचास्याष्टकरैर्धत्ते दक्षवामक्रमेण सा॥१॥ खड्गखेटांकुशगदापाशशूलवराभयान्॥ श्यामवर्णः॥

शक्तिनिधि - रेफस्य धूम्रध्वजो देवता अरुणवर्णः दक्षिणे चतुर्हस्ता वामे त्रिहस्तः प्रादक्षिण्येन स्रुक्स्रुवाक्षमालाशक्तितोमरव्यंजनघृतपात्रधरः त्रिपाद् द्विशीर्षः सर्वालंकारभूषितः॥१॥

ल

- अठ्ठाविसावे पुष्प, दंत्य वर्गातले. अंतस्थ व्यंजन

वर्णोद्धार तंत्र - ल -कारं चंचलापांगी कुंडलीत्रयसंयुतम्। पीतविद्युल्लताकारं सर्वरत्न प्रदायकम्॥ पंचदेवमयं वर्ण त्रिबिंदुसहितं सदा। आत्मादितत्त्वसहितं हृदि भावय पार्वती॥

श्रीतत्व - ला-त्मिका मोहिनी देवी स्वर्णाभा गजसंस्थिता षड्भुजांकुशशूलासि खेटदानाभयान्विता॥ स्वर्ण वर्णः॥१॥


शक्तिनिधि - ल-कारस्य इंद्रोदेवता मेघश्यामः चतुर्भुजः अभयवज्रशंखवरहस्तः गजारूढः सर्वालंकारभूषितः॥१॥

व

- एकोणतिसावे ओष्ठ वर्गातील अंतस्थ, दंतौष्ठ व्यंजन.

कामधेनु तंत्र - 'व'कारं चंचलापांगी कुंडली मोक्षमव्ययम्। पंचप्राणमयं वर्ण त्रिशक्तिसहितं सदा॥ त्रिबिंदुसहितं वर्ण आत्मादितत्त्वसंयुतम्। पंचदेवमयं वर्ण सर्वसिद्धिप्रदायकम्॥

श्रीतत्त्व - वा-ख्या पारायणी देवी स्फटिका भारुणांशुका। स्फुटपद्मासना धत्ते पद्मद्वयवराभयान्॥ श्वेतवर्णः॥१॥



श कार ध्यान

शक्तिनिधि - व-कारस्य वरुणोदेवता श्यामलः द्विभुजः मकरवाहनारूढः दक्षिणे पाशहस्तः वामेऽभयप्रदः सर्वालंकारभूषितः॥१॥

श ष स ह - घर्षित ऊष्माण वर्ग


सिद्धान्ततः पाच ऊष्माण वर्ण हवे होते, परंतु जे प्रत्यक्ष उच्चारले जातात, त्यांचाच अंतर्भाव ध्वनिविदांनी केला आहे. ओष्ठ वर्गात घर्षण होत नाही. खालच्या ओठाच्या बाहेर दंतस्पर्श होतो त्याला 'उपध्मानीय' म्हणतात; ते प फ'f' असे लिहिले पाहिजेत. स्पष्टीकरणार्थ - इंग्रजी ph हा ओष्ठच परंतु 'फ़' हा उपध्मानीय असतो आणि सिंहला लिपीत त्याचा व्यवहार होत असतो. इंग्रजीत 'स' साठी 's' हे एकच अक्षर आहे. परंतु भारतीय लिप्यांच्या रोमनीकरणांत श ś, ष- ṣ व स s असे करावे लागते. 'ह' हे स्वंजन, परंतु विसर्ग (:) हा स्वर मानला जातो. तमीळ लिपीत (ஃ) हे जिह्वामूलीय वापरतात, त्याला 'आयतम्' म्हणतात. त्याला स्वर आणि व्यंजनातील दुवा मानतात.

श - तिसावे व्यंजनपुष्प, तालव्य वर्गीय.

वर्णोद्धार तंत्र - श-कारं परमेशानी शृणु वर्णं शुचिस्मिते। रक्तवर्णप्रभाकारं स्वयं परमकुंडली॥ चतुर्वर्णमयं देवी श-कारं ब्रह्मविग्रहम्॥ पंचदेवमयं वर्णं पंचप्राणात्मकं प्रिये। रजः सत्त्वतमोयुक्तं त्रिबिंदुसहितं स्वयम्। त्रिशक्तिसहितं वर्णमात्मादितत्त्व-संयुतम्॥

श्रीतत्त्व - 'शा'-ख्या मंगलगौरी तु तप्तजांबुनदप्रभा। सहस्रपद्मपीठस्था दिव्याभरणभूषिता॥१॥ चतुर्भुजा करैर्धत्ते पद्मद्वयवराभयान्॥ कनकवर्णः॥१॥

शक्तिनिधि - श-कारस्य उमा देवता श्यामवर्णा द्विभुजा दक्षिणे पद्मधरा प्रलंबवामहस्ता चंद्रकलावतंसा सर्वालंकारभूषिता॥



ष कार ध्यान



स कार ध्यान



ह कार ध्यान

ष - एकतिसावे व्यंजनपुष्प, मूर्धन्यवर्गीय.

कामधेनु तंत्र - ष-कारं शृणु चार्वांगी अष्टकोणमयं सदा। रक्तचंद्रप्रतीकाक्षं स्वयं परमकुंडली॥ चतुर्वर्गमयं वर्णं सुधानिर्मित विग्रहम्। पंचदेवमयं वर्णं पंचप्राणमयं सदा॥

श्रीतत्त्व - रक्ता 'षा'नुक्रियादेवी राजहंसवरस्थिता। पीतांबरा करैर्धत्ते पद्मद्वयवराभयान्॥ रक्त वर्णः॥

शक्तिनिधि - ष-कारस्य लक्ष्मीर्देवता कांचनप्रभा पद्मासनासीना चतुर्भुजा अभयपद्मद्वयवरहस्ता गजद्वयसमुद्धतकुंभामृताभिषिक्ता सर्वाभरणभूषिता॥१॥

स - बत्तिसावे व्यंजनपुष्प. दन्त्यवर्गीय ऊष्माण.


कामधेनु तंत्र - सकारं शृणु चार्वांगी शक्तिबीजपरात्मकम्। कोटिविद्युल्लताकारं कुंडलीत्रयसंयुतम्। पंचदेवमयं देवी पंचप्राणात्मकं सदा। रजःसत्त्वतमोयुक्तं त्रिबिंदुसहितं सदा॥

श्रीतत्त्व - स-कारस्य चंद्रो देवता स्फटिकसन्निभः सिंहासने समासीनः द्विभुजः कुमुदद्वयधारी श्यामया धृतकुमुदया रोहिण्या सहितः सर्वालंकारभूषितः॥

शक्तिनिधि - सिद्धक्रिया 'स'-काराख्या सिताम्बुजा निवासिनी। पाटलाभा करैर्धत्ते चिदंबुजवराभयान्॥ पाटलवर्णः॥१॥

ह - तेहतिसावे कंठ्य वर्णाचे महाप्राण पुष्प.

कामधेनु तंत्र - ह-कारं शृणु चार्वांगी चतुर्वर्गप्रदायकं कुंडलीद्वयसंयुक्तं रक्तविद्युल्लतोपमम्। रजःसत्त्वतमोयुक्तं पंचदेवमयं सदा॥ पंचप्राणात्मकं वर्णं त्रिशक्तिसहितं सदा। त्रिबिंदुसहितं वर्णं हृदि भावय पार्वती॥


ळ कार ध्यान

श्रीतत्त्व - आध्यायिनी 'ह'-काराख्या मत्तमातंगवाहना। पाटलाभा करैर्धत्ते चिदंबुज वराभयान्॥ पाटलवर्णः॥१॥

शक्तिनिधि - ह-कारस्य सूर्योदेवता रक्तवर्णः प्रभामंडलमध्येऽष्टदलपद्म आसीनः द्विभुजः पद्मद्वयधरः सर्वालंकारभूषितः॥१॥


व्यंजनवर्ग येथे संपत नाही. दाक्षिणात्यांत स्वर व व्यंजने संस्कृतपेक्षा अधिक वापरण्यात आहेत. लघु 'ए', 'ओ', लघु 'इ' (कुर्रियल इकारं), लघु 'उ' (कुर्रियल उ-कारम्), आणि व्यंजनांत आघातयुक्त न, र, ष (इंग्रजीत रूपांतर zh) अशी अधिक असतात.

ळ - विशेष दाक्षिणात्य 'स्वन'

तक्षशील विद्यापीठात व्याकरणकार पाणिनी याने मध्य आशियातील भाषांचे ज्ञान मिळविले होते, परंतु दाक्षिणात्य भाषांचे नाही. त्यामुळे संस्कृत व हिंदी भाषेला हा स्वन ठाऊक नसतो. ते यासाठी ड़ ढ़ असे कांहीतरी लिहितात किंवा 'टिळक'चे 'तिलक' करून टाकतात.

भारतवर्षांत ब्रह्मदेश, आसाम, बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, काश्मीर (अफगाणिस्तान-इराण) येथे हा स्वन ठाऊक नाही. मग वैदिक लोक नैर्ऋत्येकडून कसे येतील? दाक्षिणात्य प्रांत सिंध, राजपुताना, माळवा, गुजरात, महाराष्ट्र, उडीसा, तेलुगू-कन्नड, तमीळ मलयालम व सिंहला प्रांतांत त्याचा उपयोग होतो. 'ळ' ही दक्षिणात्यांची भाषा विज्ञानातील गुरुकिल्ली आहे.

यावरून आमच्या लक्षात आले की ऋग्वेद हा उत्तर भारतीयांची एकमत्ता नसून, त्याच्या महत्त्वाच्या ऋषींत दाक्षिणात्यांचा सहभाग आहे आणि ऋग्वेद कालपर्यंत भारताच्या एकात्मतेचा हा महत्त्वाचा भाषाशास्त्रीय पुरावा म्हणता येईल. असे ऋषी म्हणजे मधुच्छंद वैश्वामित्री (मं. १.१.१) पासून संवनन ऋषी (१०.१) व मधील ऋषी, - सर्व विश्वामित्र, मेधातिथि, काण्व, कुत्स आंगिरस, परुच्छेप, उत्कील कात्य, देवश्रवा, आत्रेय वंशीय, बार्हस्पत्य भारद्वाज, विरूप आंगिरस, कवष.ऐलूष



क्ष कार ध्यान

इंग्रजीत एका वाक्यांत सर्व अक्षरे येतात, अशा वाक्यांपैकी एक वाक्यः-

QUICK BROWN FOX JUMPS OVER THE LAZY DOG.

quick brown fox jumps over the lazy dog.

असेच एक वाक्य काशीचे गणपतिशास्त्री यांनी संस्कृतात तयार केले ते असे :-

अनेकवर्णक्रमरीतियुक्तः कखागघाङच्छ जझोञ टंठः।
अ डंढणः तोथदधौन पंफुल्बभौ मयूरो लवशेष सिंहः॥

- हे दाक्षिणात्य होत! वसिष्ठाने 'इळा' देवतेची विश्वामित्र-स्तुत ऋचा (ऋ.३:४.८) ही आपल्या सूक्तांत (ऋ. ७.२.८) जशीच्या तशी घेतल्याचे निमित्ताने दोघांत संघर्ष उत्पन्न होऊन तो तीन पिढ्या चालला! असो.

श्रीतत्त्व - 'लो' बंधमोचिनी देवी स्वर्णाभा गजसंस्थिता। षड्भुजांकुशशूलासि खेटदानाभयान्विता॥ स्वर्णवर्णः॥१॥

शक्तिनिधि - ळ-कारस्य सूर्योदेवता अन्यत्सर्वं पूर्ववत्॥१॥

क्ष ज्ञ श्र त्र - संयुक्त व्यंजने

क्ष हा संयुक्त वर्ण 'क+ष' पासून बनला, तरी त्याला 'अ-क्ष' वर्णमालेत स्थान यासाठी आहे, की, बीजगणितातील ते एकक (unique) चिह्न होऊन बसले आहे.

कामधेनु तंत्र - क्ष-कारं शृणु चार्वांगी कुंडलीत्रयसंयुतम्। चतुर्वर्णमयं वर्णं त्रिशक्तिसहितं सदा॥

वर्णोद्धार तंत्र - चतुर्भुजा रक्तवर्णा शुक्लांबरविभूषिताम्। रत्नालंकारसंयुक्तां वरदां पद्मलोचनाम्। गंधर्वसिद्धदेवाद्यैः धात्वमाद्यां सुरेश्वराम्। एवं ध्यात्वा क्ष-कारं तु तन्मंत्रं दशधा जपेत्॥१॥

श्रीतत्त्व - 'क्षो'मायामालिनी देवी पंचाननवरस्थिता। पंचास्या पाटला धत्ते खड्गशूलवराभयान्॥ पाटलवर्णः॥१॥

रुद्रयामल तंत्र - मंत्रमातृके अ-क्ष-माले, नद्यंतरं यासि, देशांतरं यासि द्वीपांतरं यासि॥

इति 'अ-क्ष'माला वर्णन समाप्त.

मृच्चित्रकारो, शास्त्रज्ञः, लिपिकारो सुशिक्षिकः। (**लब्धुं श्री**शा**वा**शु**क**ल्पे प्र**ण**तिं को**ऽकरो**न्न**र**:॥ या प्रश्नाचे अंगभूत उत्तर आहे - ल. श्री. वाकणकर)